**निशाणी क्र. १८९ / क लगत**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ यांचा पुढील सरतपास शपथेवर सुरु.**
**<u>अभियोग पक्षा करीता सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एम. एस. राऊत यांच्या मार्फत –</u>**

१०. स्वप्नील तांगडे यांना मी पाहिल्यास ओळखु शकते असे मी सांगीतले होते. आज रोजी स्वप्नील तांगडे हे हजर आहेत. साक्षीदाराने स्वप्नील तांगडे यांना बोट दाखवुन ओळखले. आरोपी हर्षकुमार यांच्या सदनिकेवरुन जप्त केलेल्या वस्तु या मला दाखवल्यास ओळखेल असे सांगितले होते त्याचे फोटो मला दाखवले ते हेच आहेत. या सर्व फोटोंना आर्टीकल बी–१ ते बी–१८ असे देण्यात येते.

११. या पंचनाम्याव्यतीरीक्त पोलीस हे या पंचनाम्याच्या आगोदर आमचे कार्यालयात चौकशी केली. त्यांनी कार्यालयात असे सांगितले की, त्यांचेकडे तक्रार प्राप्त झाली आहे व त्या तक्रारीचे अनुषंगाने काही जप्ती करत आहेत. मला तेथे त्यांनी पंच म्हणून काम करण्यास सांगितले. तसेच दुसरे पंच म्हणून श्री. दिनेश मिसाळ यांना सांगितले. त्या वस्तु स्वप्नीत तांगडे यांचे कॅबीन मध्ये होत्या. या वस्तु तेजस कुलकर्णी यांनी पोलिसांना दिल्या त्यामध्ये एक सि.पी.यु. काळया रंगाचा Front Tek Cyber या कंपनीचा, एक कॅशबुक रजिस्टर व एक जावक रजिस्टर, एक मॉनिटर सि.पी.यु सोबत असे जप्त केले. या सर्व जप्त वस्तुंचा जप्ती पंचनामा तयार केला.

१२. आता तो पंचनामा मला दाखवला त्यावर माझी पंच क्र. १ म्हणून सही आहे. यावर दुसरे पंच म्हणून दिनेश मिसाळ यांची सही आहे. तसेच यावर तेजस कुलकर्णी यांचीही सही आहे. पंचनाम्यावरील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे तो पंचनामा वाचुन मी त्यावर सही केली आहे. त्यास **निशाणी क्र. १९७** देण्यात येते आहे. या वस्तु आता मला दाखवल्यास मी ओळखेल. मला कॅशबुक नि.क्र. १७४ मला दाखवले ते हेच आहे. त्यावर माझी सही घेतलेली आहे तसेच जप्ती पंचनाम्याची प्रत दाखवली आहे. मला नि.क्र. ७२ आवक जावक रजिस्टर दाखवले ते हेच आहे. त्यावर माझी सही घेतलेली आहे तसेच जप्ती पंचनाम्याची प्रत दाखवली आहे. मला सि.पी.यु. काळया रंगाचा Front Tek Cyber व एक मॉनिटर डेल कंपनीचा दाखवला हाच सि.पी.यु व मॉनिटर जप्त करण्यात आला तो मी ओळखले. त्यास आर्टीकल क्र. ए–१२ व ए–१३ देण्यात येते.

<u>सरतपास- संपला.</u>

**उलटतपास – आरोपी क्र. १ ते ११ याचे मा. वकील यांच्या विनंती वरुन तहकुब करण्यात येत आहे.**

<u>समक्ष</u>

स्वाक्षरीत/-

( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

<u>श्रवणोत्तर स्वीकृती.</u>

स्वाक्षरीत/-

( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

दिनांक- २७/०१/२०२६